ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१ !



jpp51_51@jnanaprabodhini.org

गोष्ट क्र. ४

२४ जानेवारी २०२१

## स्नेहा कमळापूरकर - गिरिधारी

(१९८५- १९९१)



आम्ही आलेल्या परिस्थितीला तोंड देऊन खंबीरपणे कसं उभं राहायचं हे शिकलो. प्रबोधिनीने आमच्यावर खूप विश्वास टाकला, जबाबदाऱ्या घ्यायला शिकवल्या.

जे काम करू ते उत्तमतेनेच करू किंवा कामात पारदर्शकता ही असायलाच हवी यासारख्या गोष्टी आपण ज्या कामात जाऊ तिथे नेतच असतो.

जर आपण करत असलेल्या कामाचं महत्त्व आपल्याला योग्य प्रकारे ठाऊक असेल तर आपल्या कष्टाने आपण संपूर्ण संस्थेचं कार्यक्षेत्रही बदलू शकतो.




शिक्षण म्हणायला गेलं तर शाळेतलं शिक्षण हे सगळ्यात आनंददायी शिक्षण होतं, कधी कुठल्या गृहपाठाचा किंवा परीक्षेचा ताण आहे किंवा पाठांतर करून, रट्टा मारून लिहायचे आहे असं कधीच झालं नाही. इतिहास, मराठी या सगळ्याच विषयांबाबत शाळेकडून वेगवेगळं लिहायला, वाचायला, समजून घ्यायला कायमच खूप प्रोत्साहन मिळायचं.

प्रबोधिनीमध्ये प्रवेश झाल्यावर वर्गात विविध समाजातून आलेल्या वर्गमैत्रिणी होत्या. माझं प्राथमिक शिक्षण मराठी माध्यमातून झालेलं होतं पण वर्गात इंग्रजी माध्यमाच्या, Convent मधून आलेल्या बऱ्याच मुली होत्या. प्रबोधिनीत पहिल्यांदाच गणित आणि विज्ञान हे आम्हाला इंग्रजीतून शिकावं लागणार होतं. तेव्हा आम्ही इंग्रजी शब्द हे देवनागरीतून लिहायचो. म्हणजे Root किंवा Stem हे शब्द आम्ही रूट किंवा स्टेम असे लिहायचो, त्यामुळेच कधीच भाषेचा किंवा नव्या पद्धतीचा ताण आला नाही. आणि या वर्गातल्या विविध पार्श्वभूमी असलेल्या मैत्रिणींशी जुळवून घेताना, हा आपला – हा वेगळा हे भेद तेव्हाच पुसले गेले. वेगवेगळी शिबिरं, सहली यांद्वारे आम्ही गावात जायचो, तिथल्या स्वयंपाकघरात काम करायचो, शेतात काम करायचो, अशा अनेक अनुभवांनी शाळेने आम्हाला समृध्द केलं.

## अनुभवांची शिदोरी

युवती विभागात काम करत असताना मी पुण्यातल्या वेगवेगळ्या शाळेत अन्य प्रशालेय तासिका घ्यायचे. मुलींसाठी तंबूतली शिबिरं घ्यायचे, छात्र प्रबोधन मार्फत वेगवेगळ्या गावी जाऊन शिबिरं घेतली. असाच एका तंबू शिबिराचा अनुभव आहे. एकदा भोर जवळ आम्ही रावडी नावाच्या गावात शिबिर घेतलं आणि त्या शिबिरातच रायगडाची सहल ठरवली. निघते वेळी रोजच्या चहासाठी मागवलेलं दोन-तीन घागरी भरून दूध आलं. त्याचं करायचं काय असा प्रश्न पडल्यावर सगळ्या मुलींना दोन-दोन पेले दूध प्यायला दिलं आणि वरंधा घाटातून ट्रक मधून घेऊन गेलो. वाटेत सगळ्यांना उलट्यांचा त्रास व्हायला लागला आणि आम्हीही लहान असल्यामुळे हे सावरायचं कसं असा प्रश्न पडला. पण अशाच प्रसंगामधून आम्ही आलेल्या परिस्थितीला तोंड देऊन खंबीरपणे कसं उभं रहायचं हे शिकलो. प्रबोधिनीने आमच्यावर खूप विश्वास टाकला, जबाबदाऱ्या घ्यायला शिकवलं आणि त्यातूनच आम्ही चांगल्या प्रकारे घडत गेलो. स्मशान भूमीत चक्कर मारून येणं किंवा बोहरी आळी पाहून येणं या आणि अशा अनेक अनुभवांमुळे खंबीर होता आलं. आज मी माझ्या कामानिमित्त रात्री अपरात्री, बाहेरगावी फिरत असते, तेव्हा कुठेच भीती वाटत नाही आणि धैर्याने प्रत्येक प्रसंग हाताळण्याचं सामर्थ्य प्रबोधिनीने दिलं. व्यावहारिक गोष्टीव्यतिरिक्त बोलायचं झालं तर आमची एका ठराविक दिवसांच्या कालावधीने गिरीशराव बैठक घ्यायचे. वेगवेगळ्या विषयांकडे आम्ही पहायचो, त्यावर चर्चा करायचो, काही पुस्तकं एकत्र वाचायचो. विवेकानंद, अरविंद अशा महापुरुषांची चरित्र आम्ही वाचली, त्यांनी केलेला अभ्यास समजून घ्यायचा प्रयत्न केला. गच्चीवर, वर्गात, युवती विभागात बसून खूप पद्य म्हटली. आणि त्या सगळ्याची एक वैचारिक पायाभरणी होण्यात खूप मदत झाली. ते विचार, ते संस्कार मनात खोलवर रुजले गेले.

मला पहिल्यापासूनच वकील व्हायचं होतं, त्याला ठाम कारण असं काही नाही. पण मला लहानपणापासून वाद घालायला, एखादी गोष्ट पटवून द्यायला आवडायचं. मला लहानपणी मजेने 'तू चांगली वकील होशील' असंही म्हणायचे. कायद्याचं शिक्षण घेताना कायमच प्रबोधिनीचं काम आणि महाविद्यालयीन प्रकल्प असं काही एकत्र करता येईल का हे डोक्यात होतं. तेव्हा त्या काळी मी खूप आवडीने Legal aid Center चं काम करायचे. मग त्या कामाची काही शिबिरं घ्यायची असायची ती मी आवर्जून प्रबोधिनीची कामं ज्या भागात चालतात तिथेच योजना करायचे. ते काम करत असताना असं लक्षात आलं की ग्रामीण भागामध्ये महिलांना कायद्याचे खूप प्रश्न आहेत, तिथे आपला कायदा किंवा हे विचार अजून पोचले नाहीत, तेव्हा असं हळूहळू लक्षात येत गेलं की मला फक्त माझा व्यवसाय किंवा practice करायची नाहीये. या गरजू आणि ग्रामीण महिलांना सशक्त करण्याच्या कामाची गरज आहे. सामाजिक बांधिलकी आणि अर्थार्जन अशा दोन गोष्टी जिथे जुळू शकतात असं काम आपल्याला करायचं आहे.

पदवी झाल्यानंतर मी एक संपूर्ण वर्ष प्रबोधिनीत काम केलं, तेव्हा आपल्या सगळ्या ताया जे काम करतात तसं आपणही काम करायचं, आपल्या शाळेने आपल्याला इतकं दिलं तर एक वर्षभर काम करणं ही आपली नैतिक जबाबदारी आहे असं वाटायचं. त्यावेळेला मी एक संपूर्ण वर्ष हट्टाने ग्रामविकसन विभागात काम केलं होतं. त्यावेळेला ग्रामीण जीवन

हे खूप जवळून पाहता आलं, त्यातले प्रश्न, त्यातली उत्तरं दिसायची. त्याचा पुढच्या कामात नक्कीच उपयोग झाला.

शिक्षण झाल्यानंतर सनद मिळवण्यासाठी तेव्हा एक वर्ष practice करावी लागे, तेव्हा मी कुटुंब न्यायालयात काम करायचे. त्यावेळी असं लक्षात आलं की कायदा हा स्त्रियांच्या प्रश्नावर काम करू शकतो, स्त्रीला न्याय मिळवून देऊ शकतो पण मुळातल्या प्रश्नाच्या निर्मूलनाचं काम कायदा करू शकत नाही. एखादी पीडित महिला जर कोर्टात आली तर तिला पुढे असा त्रास होणार नाही याची काळजी कायदा घेईल पण तिच्यावर ही वेळच यायला नको यासाठी मात्र कायदा काही करू शकत नाही. Law is a curative measure than a preventive one. तेव्हा काम करताना असं लक्षात येत गेलं की खरच जर महिलांच्या सबलीकरणासाठी काम करायचं असेल तर आपण कायद्याच्या क्षेत्रात काम करण्यापेक्षा विकास क्षेत्रात काम करावं म्हणजे महिलांचे प्रश्न जास्त चांगल्या प्रकारे ओळखता येतील आणि सोडवता येतील. या विचाराने micro finance या कार्यक्षेत्रात काम करत असणाऱ्या एका NGO मध्ये मी काम सुरू केलं. ती संस्था पुण्यातील नागरी वस्त्यांमधल्या बायकांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी काम करत होती. त्यांचे एक हजारच्या वर बचतगट, कर्ज व्यवस्था यावर प्रकल्प होते. जर स्त्रिया या आर्थिकदृष्ट्या सबल असतील तर त्यांना शारीरिक त्रास फारसा होणार नाही असं मला तेव्हा वाटत होतं.


डॉ. मोहोमद युनूस यांच्यासह

त्यावेळी काम करताना असं एक जाणवलं की फक्त आर्थिक किंवा फक्त सामाजिक असा विकास करून चालत नाही. विकास हा सर्वांगीण असावा लागतो. बऱ्याचदा खूप संस्था स्त्रियांसाठी काम करत असतात, पण लिंग समानतेसाठी (gender equality) ते काम करतातच असं नाही. माझं शिक्षण हे फारसं समाजशास्त्र किंवा या अंगाने झालं नव्हतं, हे सगळे विचार मी आधीच्या आयुष्यात ऐकलेच नव्हते. पुढे २००६ साली मी एका swissaid नावाच्या आंतरराष्ट्रीय संस्थेसाठी काम करायला सुरुवात केली. तिथे मी माझं कौटुंबिक हिंसाचार (domestic violence) आणि लिंगभेद मिटवण्यासाठीचं काम सुरू केलं. या संस्थेचं मुख्य काम हे शेतीविषयक होतं. कौटुंबिक हिंसाचार हा एक अतिशय छोटासा विषय त्या संस्थेसाठी होता. काही वर्षांनी काम करताना असं लक्षात आलं की हे काम इतकं लहान असू शकत नाही. आणि मग आम्ही हळूहळू संस्था म्हणून या विषयावर काम सुरू केलं. यामुळे आमचं कामही बदललं. हे सांगायला नक्कीच आनंद होतो, की आज या संस्थेचं काम पुढे खूप छान बहरत गेलं, नवीन कामाच्या दिशा मिळाल्या आणि आमच्याबरोबर आज अनेक संस्था, अनेक लोक या कामात आहेत. या सगळ्यावरून एवढं नक्की सांगायला आवडेल, की जर आपण करत असलेल्या कामाचं महत्त्व आपल्याला योग्य प्रकारे ठाऊक असेल तर आपल्या कष्टाने आपण संपूर्ण संस्थेचं कार्यक्षेत्रही बदलू शकतो.

आम्ही जे काम करतो त्याचं स्वरूप सांगायचं झालं तर आमच्याकडे येणाऱ्या पीडित महिलांना कायदेशीर आधार देणं, त्यांच्यासाठी एखादी गावपातळीवर योजना तयार करणं या प्रकारचं काम आम्ही करत होतो. पण अशा वेळी लक्षात येत गेलं की त्या महिलेला कायदा सांगून काही उपयोगच नाहीये. तिला तेव्हा गरज असते ती भावनिक आधाराची, तिला सांभाळून घेण्याची, समुपदेशनाची (counseling). यांची गरज लक्षात आल्यावर मी पुण्यातल्या डॉ. शिरीषा साठे आणि डॉ. कौस्तुभ जोग याच्याशी संपर्क साधला. आपल्या कार्यकर्त्यांसाठी आपण काही कार्यशाळा घेऊ शकतो का असा विचार केला. हे काम एखाद्या कार्यशाळेत शिकण्याचं नव्हतं. तेव्हा आम्ही अडीच वर्षांचा एक प्रकल्प केला ज्यात वेगवेगळी व्याख्यानं घेतली, सत्रं घेतली, गृहपाठ दिले, नवीन कामं करून घेतली आणि तळागाळात समुपदेशन (counseling) करण्याऱ्या कार्यकर्त्यांचा एक छान गट तयार झाला. यामुळे महिलांच्या मानसिक आरोग्यावर काम करायला सुरुवात झाली, नुसते तोंडी कायदे सांगण्यापेक्षा खरंच त्या महिलांना मदत करता आली, आत्महत्या रोखता आल्या. नंतर आम्ही याच अडीच वर्षांच्या अभ्यासक्रमाचं (course) रूपांतर हे एका हस्तपुस्तिकेत (manual) केले. वाचकांना सहज वापरता येईल आणि पीडित महिलेने जरी ते वाचलं तरी तिला थोडासा आधार वाटेल असं करण्याचा प्रयत्न केला. ह्या हस्तपुस्तिकेचं काम पूर्ण झाल्यावर आम्ही महाराष्ट्र सरकारच्या स्त्री सशक्तीकरण विभागाकडे हे पाठवले आणि त्यांनी याचा वापर सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी करावा अशी विनंती केली. महिला आयोगाने हे पुस्तक स्वीकारलं



आणि आता याचा वापरही होतो. त्याला प्रस्तावना दिली आणि त्याचा उपयोग आता बऱ्याच मोठ्या पातळीवर चालू आहे.




बऱ्याचदा आपल्या समाजात आपण जी नाती जपतो त्यांच्या मागचा-पुढचा विचार फारसा करत नाही. म्हणजे राखी का बांधायची? कोणाला बांधायची? नवऱ्याला पाडव्याला का ओवाळायचं? असे प्रश्न आपण फारसे विचारात घेत नाही. याबद्दल आपण खुलेपणाने बोललं पाहिजे, प्रश्न समजून घेतले पाहिजेत. gender roles, मुलीने हे काम करायचं आणि मुलाने हे याबद्दल बोललं गेलं पाहिजे. आपण बऱ्याच वेळा आर्थिक सक्षमीकरणाबद्दल बोलत असतो. आपण लिंगभेद समजण्यासाठी (gender understanding) स्त्री-पुरुष या सगळ्यांबरोबर काम करायला हवं. फक्त महिलांबरोबर काम करून कुठलाही प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी तरुण मुलं, त्यांचं शिक्षण यावरही भर द्यायला हवा.

काही संस्था अशाही दिसतात, त्या पैसे घेऊनही काम करत नाहीत, त्यांना खूप मोठा विचार करायचा नसतो, कामाच्या बाबतीत हवं तेवढं गांभीर्य दिसत नाही. शेवटी मिळणारं फलित (end product) बघून काम करणाऱ्या खूप संस्था दिसतात आणि त्याचाही बऱ्याचदा मानसिक त्रास होत असतो.

सुरुवातीला जेव्हा मी हे प्रकल्प हातात घेतले, त्यासाठी माहिती मिळवायचे तेव्हा अक्षरशः रडायला यायचं. तिथे गेल्यावर त्यांचे अनुभव ऐकून मन खूप सुन्न व्हायचं. खूप वेळा आपण काहीच करू शकत नाही असं वाटायचं. आपण सगळ्या विषयावर काम करू शकत नाही असं वाटून निराशा यायची, आत्मविश्वास कमी व्हायचा. पण मला असं वाटतं की जितके प्रश्न जास्त तितकी काम करायची गरजही जास्त वाटायला लागते. आम्ही कौशल्य विकसन सारख्या क्षेत्रात उतरलो. हा प्रश्न किती मोठा आहे याचा आवाका लक्षात आल्यावर कधी-कधी थकायला होतं, पण तिथे काम करणारी माणसं आणि संस्था, त्यांचा उत्साह पहिला की त्यातून खूप प्रेरणा मिळते.

कोणीही व्यक्ती ही कधीच चला आपण नेतृत्व करू असं म्हणून पुढे जात नाही. मला प्रकर्षाने असं वाटतं की एखाद्या प्रश्नाबद्दल काम करायची तीव्र इच्छा असावी लागते, तेवढी त्या प्रश्नाबद्दल कळकळ असावी लागते, राग असावा लागतो. परिस्थिती बदलायची इच्छा असली की मग आपण त्यासाठी वाटेल ते करायची तयारी दाखवतो. आणि मग साहजिकच नेत्याला लागणाऱ्या सगळ्या गुणवत्ता या त्या माणसात उतरत जातात. प्रबोधिनीत मिळालेल्या काही शिकवणी म्हणजे, जे काम करू ते उत्तमतेनेच करू किंवा कामात पारदर्शकता ही असायलाच हवी यासारख्या गोष्टी आपण ज्या कामात जाऊ तिथे नेतच असतो. पण आपण काम करत असलेल्या प्रश्नाचं गांभीर्य आणि त्याचं महत्त्व जर त्या व्यक्तीला ठाऊक असेल तर त्यासाठी जे-जे गुण लागतात म्हणजे नेतृत्व, संवाद इ. ते तो घेतच जातो.

पदव्युत्तर शिक्षण झाल्यानंतर मला नोकरीच्या बऱ्याच संधी चालून आल्या होत्या, पण आपल्याला काहीतरी वेगळं काम करायचं आहे हे लक्षात आल्यावर त्या सगळ्या संधी सोडून दिल्या. सामाजिक कामांमधून जो मोबदला मिळतो, त्यातून बऱ्याचदा आपल्या आर्थिक गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. माझा नवराही सामाजिक कामात कार्यकर्ता असल्यामुळे आमच्या दोघांचं उत्पन्न हे जुजबी होतं. त्यामुळे सुरुवातीला आर्थिक ओढाताणही खूप व्हायची. कितीही जरी मनात असलं की आपल्याला समाजासाठी काम करायचं आहे, तरी तरुण वयात बऱ्याचदा आपण स्वतःची तुलना इतर लोकांशी करतो. ते कुठे गेले? आपण कुठे आहोत? असे प्रश्न पडायचे. आणि त्याचा त्रास व्हायचा. अजून एक गोष्ट जी प्रकर्षाने जाणवायची, ती म्हणजे आपली बौद्धिक भूक खूप असते. आपल्या बुद्धीला चालना देणारी अशी कामं कायम आपल्याला करायची असतात. जिथे आपल्या सगळ्या क्षमता ताणल्या जातात असं काम आपल्याला करायचं असतं. आणि मग असं वाटत राहतं की या कामातून ती भूक भागत नाहीये, असं लक्षात आल्यावर थोडा त्रास व्हायचा. अशा वेळेस स्वतःला समजावता यायला हवं की आत्ताचं प्राधान्य हे आपली बौद्धिक क्षमता ताणणे हे नसून तळागाळात (ground level) काय कामाची गरज आहे हे ओळखून ते काम करणं ही आहे. जेव्हा आपण मोठ्ठ्या पातळीवरचं काम करतो तेव्हा आपलं व्यक्तीवरचं लक्ष कमी होतं, आणि कामाची दिशा ही product oriented होत जाते. असा गोंधळ आजही मनात कधीतरी उठतो आणि तळागाळात काम करावं असं अजूनही वाटतं.

प्रबोधिनीत आपण जेव्हा बुद्धिमंतांचं शिक्षण असं म्हणतो तेव्हा असं कुठेतरी वाटत की भटक्या जमाती, आदिवासी, ग्रामीण भागापर्यंत आपण पोचत नाही. आपले वर्गमित्र हे उच्च मध्यमवर्गीय, शहरात राहणारे, किंवा ग्रामीण असतील तरी पुरेशा संधी उपलब्ध असणारेच असतात. तेव्हा ही संकल्पना थोडी कृत्रिम वाटते. मी आता असे खूप कार्यकर्ते पाहते जे

गावातच काम करतात, तिथेच वाढलेले आहेत आणि जास्त उत्तम प्रकारे तिथलं काम ते करू शकतात. हे पाहिल्यावर मग हा बुद्धिमान, याच्या नेतृत्वाचा विकास ही संकल्पना पचायला थोडी जड जाते. आपण बऱ्याचदा पराक्रम, उच्च शिक्षण, मोठं काहीतरी करून दाखवणं अशी स्वप्न बघताना तळागाळातल्या घटकांचा किती विचार करतो? किंवा अशीच उदाहरणं आपल्याला जास्त दिसतात का प्रबोधिनीत? आपण जी शाळेत पद्यं म्हणतो, त्यातली किती पद्य ही समाजातल्या त्या माणसांबरोबर बसून मला म्हणता येतील? त्यातले शब्द त्यातले विचार हे त्यांच्यासाठी खरंच आहेत का? त्याचा relevance त्याची भाषा ही त्यांच्यासाठी आहे का? स्त्री–पुरुष समानता किंवा लिंगभाव समानता आपण प्रबोधिनीत कधी पाहत नाही. आपण आपल्या युवक/युवती, प्रशालेतल्या मुलांशी किती वेळा या विषयावर बोलतो? त्यांची जाणीव पातळी ही तेवढी वाढलेली आहे का? याचा विचार करायला हवा असं वाटत राहतं. आणखी एक म्हणजे प्रबोधिनीत आपण भावनिक उलाढाल, आपले संबंध, आपली नाती त्यातले प्रश्न कसे हाताळायचे याबद्दलही फारसं शिकत नाही.

या सगळ्या प्रवासात खूप गुरुतुल्य व्यक्तींची साथ मिळाली. माझ्या कुटुंबाचा या सगळ्याला एक खूप मोठा आधारस्तंभ होता. तसेच माझ्याबरोबर आज काम करणारी अनेक माणसं जी आज सत्तरीला आली तरी ज्या उत्साहाने काम करतात ते खूप शिकण्यासारख आहे. त्यामुळे आजही दमलो किंवा थकलो असे शब्द उच्चारायचीच लाज वाटते. जो माणूस भेटतो तो या सगळ्या प्रवासात काहीतरी शिकवतच असतो असं मला वाटतं.

काही वेळेला जरा वाईट वाटतं की आज माझ्या वर्गमैत्रिणींशी माझा फारसा संपर्क नाही, पण गिरीशराव, सुभाषराव यांच्याशी संपर्क असतो. माझं चालू काम हे उस्मानाबाद या जिल्ह्यातील असल्यामुळे माझा हराळी आणि सोलापूरच्या प्रबोधिनीच्या केंद्रांशी नियमित संपर्क असतो. गौरीताई, अभिजितदादा यांच्याशी कामाबद्दल चर्चा होत असतात.

नवीन प्रबोधकांना काही सांगण्याएवढी अजूनतरी मी मोठी झालेले नाही. पण एक स्त्री म्हणून एवढं नक्की पोचवेन, की आपला स्वतःचा विचार करायचा राहून जातो. आपल्या कामातून आपल्या काय अपेक्षा आहेत? काय काम करायचं? नक्की हेच काम करायचं का? अशा प्रश्नांचा जर तरुणपणी जास्त विचार केला तर पुरेसा वेळ आपल्या हातात राहतो आणि आपलं काम आपण अजून चांगल्या पद्धतीने करू शकतो. अनेक सामाजिक दबाव आपल्यावर सतत काम करत असतात आणि आपण त्यांना किती बळी पडायचं? त्यांना किती challenge करायचं याचा विचार आपण करायला हवा. आपल्या आयुष्यात अशी काही तत्त्व असायला हवीत ज्यावर कधीच आपण तडजोड करू शकत नाही. ती आपल्या मार्गात आपल्याला पुढे जायला नक्की मदत करतात.

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट – मला चित्रपट बघायला फारसा वेळ मिळतच नाही त्यामुळे नाही सांगू शकणार.
२. आवडते पुस्तक – वीणा गवाणकर यांनी लिहिलेली व्यक्तिचित्रं
३. तुमचा छंद – निसर्गरम्य ठिकाणी प्रवास करायला आवडतं, पुस्तकं वाचायला आवडतात.
४. पहिली प्रतिक्रिया –
   १. महिला सशक्तीकरण– आवश्यक आणि प्रयत्न खूप करायला हवेत.
   २. भारताचा कायदा – अंमलबजावणी चांगली व्हायला हवी.
   ३. महिलांचा विकास – लवकरच बदल दिसतील अशी आशा
   ४. ज्ञान प्रबोधिनी – माझं दुसरं घर
५. आत्ताचं आयुष्य सोडल्यास आणखी अशी एखादी संधी मिळाली तर शेतीवर काम करायला आवडेल.

स्नेहा कमळापूरकर – गिरिधारी
sneha@swissaidindia.org
9420177542

**मुलाखत व शब्दांकन – ईशा कान्हेरे, चिन्मयी खरे      संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org